# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

जा.क्र. पगो/२०१७/२५८ दि. ०५/१२/२०१७
०६

**महत्वाचे व तातडीचे**

प्रति
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
(विद्यापीठ परीक्षांचे महाविद्यालयातील केंद्र)

विषय : मार्च/एप्रिल २०१८ पासून घेण्यात येणा–या विद्यापीठ परीक्षांसाठी आवश्यक साहित्याच्या मागणीबाबत...

महोदय/महोदया,

विद्यापीठ परीक्षा विभागाने मार्च/एप्रिल २०१८ पासून विविध परीक्षांचे आयोजन केलेले असून यासंबंधीची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

आपल्या महाविद्यालयास मार्च/एप्रिल २०१८ मध्ये होणा–या विविध परीक्षांसाठी आपणांस आवश्यक असलेल्या साहित्याची /स्टेशनरीची मागणी ऑनलाईन पध्दतीने सोमवार, दि. १५/०१/२०१८ पूर्वी भरावी. ऑनलाईनद्वारे स्टेशनरीची नोंद न झाल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

विद्यापीठाने प्रथम वर्ष कला, ललितकला, मानसनीती व समाजविज्ञान, वाणिज्य, विज्ञान, विज्ञान (संगणक) व विज्ञान (जैवतंत्रज्ञान) तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. आणि बी.बी.एम. (आय.बी.) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा शैक्षणिक वर्ष २०१०–११ पासून महाविद्यालयाकडे वर्ग केले असल्याचे संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/१६३३, दि. २४ नोव्हेंबर २००९ रोजी कळविलेले आहे. या परीक्षेसाठी लागणारी स्टेशनरी व को–या उत्तरपत्रिका संबंधित महाविद्यालयानें छापून घ्यावयाच्या आहेत. त्या परीक्षांव्यतिरिक्त इतर परीक्षांसाठी आवश्यक स्टेशनरीचीच मागणी नोंदविण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयाकडे वर्ग केलेल्या परीक्षेसाठी विद्यापीठाची स्टेशनरी को–या उत्तरपत्रिका वापरण्यात येऊ नये.

ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१७ मध्ये आपणांस विद्यापीठाच्या परीक्षांसाठी वितरीत करण्यात आलेल्या स्टेशनरीपैकी काही स्टेशनरी शिल्लक असल्यास त्या स्टेशनरीचा प्रथम मार्च/एप्रिल २०१८ च्या परीक्षांसाठी उपयोग करण्यात यावा. यापूर्वीची अत्यंत जुनी व जीर्ण झालेली स्टेशनरी वापरण्यात येऊ नये व अशी स्टेशनरी अथवा परीक्षेचे साहित्य आपल्याकडे शिल्लक असल्यास त्यासंबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयाकडे स्वतंत्र पत्रान्वये कळविण्यात यावी म्हणजे ती घेऊन जाण्याची व्यवस्था करता येऊ शकेल.

यासंबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयास न कळविल्यास ती उचलून घेऊन जाण्याची जबाबदारी विद्यापीठ कार्यालयाची राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

मार्च/एप्रिल २०१८ मध्ये होणा–या परीक्षा बारकोड नुसार आहेत याची नोंद घेऊन मुख्य उत्तरपत्रिकांची संख्या कळवावी. या सर्व उत्तरपत्रिका फक्त विद्यापीठ परीक्षांसाठी वापरण्यात याव्यात व शिल्लक राहिलेल्या उत्तरपत्रिकांची नोंद घेऊन त्या व्यवस्थित पुढील परीक्षांसाठी सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत खराब झालेली उत्तरपत्रिका अथवा अर्धवट वापरलेली उत्तरपत्रिका रद्दी म्हणून फेकून देण्यात येऊ नये. तर त्याची नोंद घेऊन दप्तरी दाखल करावी. कारण आपल्या महाविद्यालयाच्या नावांवर या सर्व उत्तरपत्रिकां स्वीकारल्याची नोंद विद्यापीठ कार्यालयाकडे करण्यात येत आहे.

विद्यापीठ परिपत्रक क्र. १९४/२००६, दि. २० मे २००६ अन्वये (Learning Disability) अध्ययन अक्षमता असणा–या विद्यार्थ्यांसाठी ऑक्टोबर २०१६ पासूनच्या परीक्षांसाठी बारकोडप्रमाणेच उत्तरपत्रिका वापरावयाच्या आहेत. प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांनी त्यांच्या महाविद्यालयात अध्ययन अक्षमता असणा–या विद्यार्थ्यांची यादी देऊन ती प्रमाणित करावयाची आहे.

त्याचप्रमाणे परीक्षांचे साहित्य महाविद्यालयाच्या ज्या प्रतिनिधीच्या ताब्यात द्यावयाचे आहे त्या प्रतिनिधीचे नांव, मोबाईल नंबर व कार्यालयाचा फोन नंबर या पत्रासोबत कळविल्यास त्यासंबंधी परीक्षेचे साहित्य वितरित करीत असताना संपर्क साधण्यास मदत होईल.

तरी आपणांस विंनती करण्यात येते की, वरील परीक्षेच्या साहित्याची मागणी तातडीने ऑनलाईनद्वारे सोमवार, दि. १५/०१/२०१८ पूर्वी भरावी. ऐनवेळी परीक्षेच्या साहित्याची मागणी केल्यास ती पुरविणे शक्य होणार नाही. व अशा वेळी सदर परीक्षा साहित्य आपणांस घेऊन जाण्याची व्यवस्था करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच परीक्षा गोदाम कक्षाने मान्य केलेल्या स्टेशनरी व्यतिरिक्त परीक्षा चालू असताना अतिरिक्त स्टेशनरी लागल्यास ती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येईल. महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने स्टेशनरीची मागणी न दिल्यास त्यांना स्टेशनरी दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१७ च्या विद्यापीठ परीक्षांच्या प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे गोदाम कक्षात आणून जमा करु नयेत. सर्व महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयात परीक्षा कस्टडीमध्ये ठेवावेत. सदर प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांच्या गठ्ठयांची विल्हेवाट लावण्याची तारीख महाविद्यालयांना नंतर कळविली जाईल. त्यावेळी महाविद्यालयांनी संबंधित प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे गोदाम कक्षात आणून जमा करावेत.

*ऑनलाईनद्वारे भरलेल्या स्टेशनरीची हॉर्ड कॉपी देणे आवश्यक आहे.*
*सोमवार, दि. १५/०१/२०१८ नंतर स्टेशनरीची लिंक कोणत्याही परिस्थितीत चालू राहणार नाही.*

## ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरण्यासाठी आवश्यक सूचना:

१. परीक्षा साहित्य मागविण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरावयाचा आहे.
२. Examination मध्ये Godown : Examination Stationery Requisition online System ला क्लिक करा.
३. Online Godown System ला क्लिक केल्यानंतर College/Department Login वर क्लिक करा.
४. BCUD User Name आणि Passwoard वापरुन Login करा.

५. इथे तुम्हाला.Demand Entry चे बटन दिसेल, ते क्लिक केल्यानंतर जो फॉर्म ओपन होईल त्यावर विचारलेली सर्व माहिती भरावयाची आहे.

६. ती माहिती Save बटन दाबून Save करा.

ऑनलाईन फॉर्म एकदा ओपन केल्यानंतर २० मिनिटानंतर बंद होतो. त्यापूर्वी तो भरुन ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा पुन्हा लॉग इन करुन तो फॉर्म भरावा लागेल. त्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरण्यापूर्वी सर्व माहिती कागदावर संकलित करुन घ्या. मगच ऑनलाईन पध्दतीने भरा ज्यायोगे ऑनलाईन फॉर्म भरणे सोईचे होईल.

परीक्षा आयोजनासाठी नेहमीप्रमाणे सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला,

संचालक

(परीक्षा व मूल्यमापन मंडळ)